# प्रथमावृत्तीचे निवेदन

भाषा संचालनालयाचे पहिले प्रकाशन म्हणून गेल्या जून महिन्यात प्रस्तुत पदनाम कोश प्रकाशित करण्यात आला. कोशास अंतिम स्वरूप देण्यापूर्वी त्याच्या मर्यादित प्रती छापून अभिप्राय व सूचना मागवण्याच्या दृष्टीने त्या सचिवालयीन विभाग, अन्य सरकारी कार्यालये, प्रमुख वृत्तपत्रे आणि महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील मराठीकरणाविषयी आस्था असलेल्या मान्यवर विद्वान व्यक्ती यांजकडे पाठवण्यात आल्या.

कोशातील पर्याय मुख्यत्वेकरून हरघडी ज्यांना वापरायचे आहेत व पर्यायांच्या अर्थव्याप्तीविषयी ज्यांना अचूक कल्पना आहे अशा सरकारी कार्यालयांतील अधिकाऱ्यांनी, आपापल्या विभागातील पदनामे समर्पक असल्याचा सामान्यतः निर्वाळा दिला. या कार्यालयांनी केलेल्या सूचनांचा व सुचवलेल्या बदलांचा भाषा सल्लागार मंडळाने अगत्यपूर्वक व बारकाईने पुन्हा विचार केला. परिभाषेच्या शास्त्रपूत तत्त्वांशी सुसंगत ठरतील व निश्चित अर्थ सुयोग्य रीतीने व्यक्त करू शकतील असेच पर्याय निवडण्याचे मंडळाचे धोरण होते. नव्याने सुचवण्यात आलेले बदल याच निकषावर पारखून घेण्यात आले व जरूर तेथे स्वीकारण्यातही आले. या राज्याच्या चार घटक प्रदेशांत एकाच इंग्रजी पदनामासाठी चार निरनिराळ्या पर्यायांचा उपयोग केला जात आहे. एकसूत्रतेच्या दृष्टीने ही विसंगती काढून टाकणे अतिशय महत्त्वाचे होते. राज्यातील सर्व सरकारी कार्यालयांतील पदनामे एकरूप राहावीत म्हणून त्यांच्याकडून आलेल्या सूचनांचा अधिक लक्षपूर्वक विचार करावा लागला.

वृत्तपत्रांतून आणि मान्यवर विद्वानांकडून प्रकट झालेल्या अभिप्रायांचा साकल्याने विचार करता त्यांचा दृष्टिकोन काही अपवाद सोडल्यास स्वागतपर असल्याचेच दिसून आले. या अभिप्रायांत दोन टोके आढळली. काहींनी प्रस्तुत कोशातील उरले सुरले परकीय शब्द काढून टाकून त्याऐवजी संस्कृत शब्द योजावेत असे प्रतिपादन केले, तर काहींनी, मराठी पर्याय उपलब्ध नसल्यास इंग्रजी शब्द देवनागरीत लिहावे पण संस्कृत शब्द वापरून कोशाचे स्वरूप दुर्बोध आणि बोजड करू नये असे मत व्यक्त केले. वृत्तपत्रांनी व विद्वानांनी केलेल्या विधायक सूचनांचा आस्थापूर्वक विचार करण्यात येऊन मंडळाने अंगीकारलेल्या तत्त्वांशी सुसंगत ठरतील असे बदल योग्य त्या ठिकाणी मान्य करण्यात आले.

भाषावार प्रांतरचनेमुळे प्रादेशिक भाषांना राजभाषेची प्रतिष्ठा प्राप्त होणार असली तरी केंद्र शासनाशी तसेच परस्परांशी व्यवहार करताना प्रत्येक राज्याला एकरूपतेच्या दृष्टीने

सर्वसामान्य अशा काही पारिभाषिक संज्ञांचा अवलंब करणे अपरिहार्य ठरते. या कोशातील पर्याय निश्चित करताना भाषा सल्लागार मंडळाला ही मर्यादा दृष्टिआड करणे अशक्य होते. प्रस्तुत कोशातील सुमारे पाच हजार पदनामांपैकी अशा पारिभाषिक संज्ञांची संख्या जेमतेम दोनशेपर्यंत आहे.

अर्थवाहक मराठी पर्यायांची निवड किंवा निर्मिती केली नाही तर मराठीचे तोकडे भासणारे शब्दभांडार कधीच संपन्न होऊ शकणार नाही. संक्रमणावस्थेतील अडचणी कालांतराने आपोआपच नाहीशा होत असल्यामुळे आज दुर्बोध वाटणारे पण समर्पक असणारे मराठी पर्याय केवळ रूढ नाहीत म्हणून त्याज्य समजले जाऊ नयेत अशी अपेक्षा आहे. उपलब्ध पर्यायांची निवड करताना किंवा नवीन पर्याय तयार करताना, भाषा सल्लागार मंडळाने भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून जी तत्त्वे पायाभूत मानली त्यामागील सविस्तर भूमिका स्पष्ट करणारी एक पुस्तिका शासनाद्वारे लवकरच प्रकाशित करण्यात येत आहे. तीवरून या प्रश्नाचे शास्त्रीय आणि व्यापक स्वरूप सहज समजून येईल.

प्रस्तुत पदनाम कोशावर आपली मते व्यक्त करणाऱ्या व सूचना पाठवणाऱ्या सर्व व्यक्तींचे शासन आभारी आहे. यथोचित परिष्करणानंतर या कोशाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. या कोशातील पर्यायांचा वापर सरकारी कार्यालयांतूनच नव्हे तर खाजगी संस्था, वृत्तपत्रे आणि सर्व संबंधित व्यक्ती यांजकडून सतत होत राहिल्यास, हा उपक्रम निश्चित यशस्वी होईल असे वाटते.

**वा. ना. पंडित**
भाषा संचालक व सचिव,
भाषा सल्लागार मंडळ.